दैनिक लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८६ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, ४ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

# महायुतीचा उमेदवार जाहीर नाही पण, निवडणुक प्रचार संयुक्त समिती गठीत



■ठाणे, विशाल कारंडे,

ठाणे लोकसभा मतदार संघाच्या जागेवर महायुतीकडून अद्याप उमेदवार जाहीर करण्यात आलेला नसला तरी येथील महायुतीच्या नेत्यांनी निवडणुक प्रचार नियोजनासाठी संयुक्त समिती गठीत केली आहे. निवडणुक सभा, बैठका, पोस्टर मजकूर तसेच इतर कामांचे नियोजन ही समिती करणार असून या समितीने महायुतीचा पहिला मेळावा ठाण्यात आज आयोजित केला होता. यानिमित्ताने उमेदवार जाहीर नाही पण, निवडणुक समिती जाहीर, अशी चर्चा रंगली आहे. ठाणे जिल्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील ठाणे, कल्याण आणि भिवंडी या तिन्ही जागांच्या निवडणुका मुख्यमंत्र्यांच्या प्रतिष्ठेची मानली जात आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाने राजन विचारे यांना ठाणे लोकसभा मतदार संघाची उमेदवारी जाहीर केली असली तरी महायुतीकडून अद्याप उमेदवार घोषित करण्यात आलेला नाही. या जागेवर भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांकडून दावे करण्यात येत असून यामुळे या जागेचा तिढा अद्याप सुटू शकलेला नाही. ही जागा कोणत्या पक्षाला मिळणार आणि उमेदवार कोण असेल, याविषयीची उत्स्कूता वाढली आहे. शिवसेनेने दबाव वाढविण्यासाठी बैठकांचा सपाटा लावला असून त्यात पदाधिकारी ही जागा शिवसेनेलाच मिळावी असा सूर लावत आहेत. असे चित्र असतानाच, ठाण्यातील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी या महायुतीच्या नेत्यांनी मंगळवारी शहनाई हॉलमध्ये एक संयुक्त बैठक आयोजित केली होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या आदेशानुसार ही बैठक घेण्यात आल्याचे सुत्रांकडून समजते. या बैठकीला शिवसेना प्रवक्ते नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, रविंद्र फाटक, भाजपचे आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे, गीता जैन, माजी खासदार संजीव नाईक, संदीप नाईक, शहर अध्यक्ष संजय वाघुले आणि राष्ट्रवादीचे प्रवक्ते आनंद परांजपे, नजीब मुल्ला, प्रभाकर सावंत व इतर पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत निवडणुक प्रचाराचे नियोजन करण्यासाठी संयुक्त समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला. या समितीमध्ये पक्षाचे आमदार, जिल्हाध्यक्ष आणि प्रमुख पदाधिकारी यांचा समावेश आहे. निवडणुक सभा, बैठका, पोस्टर मजकूर तसेच इतर कामांचे नियोजन ही समिती करणार असून या समितीने आज, बुधवारी महायुतीचा पहिला मेळावा ठाण्यात आयोजित केला होता. तसेच ४ एप्रिल रोजी मिरा भाईंदर आणि १० एप्रिल रोजी नवी मुंबईला महायुतीचा मेळावा घेण्याचे बैठकीत ठरले आहे.

# दिग्गज कलाकारांच्या कलाविष्काराने सजणार 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टचा संगीत महोत्सव



■पुणे, अभिजीत येरुल्लू,

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे गणपती मंदिराच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त गुढीपाडव्यापासून म्हणजेच दि. ९ ते १३ एप्रिल पर्यंत संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी महाराष्ट्रातील दिग्गज कलाकारांचा कलाविष्कार अनुभविण्याची संधी पुणेकरांना मिळणार असून बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि.प्रशालेच्या प्रांगणात दररोज सायंकाळी ७ ते रात्री १० यावेळेत कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी आणि सरचिटणीस हेमंत रासने यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदाचा संगीत महोत्सव वैविध्यपूर्ण कलांनी सजलेला असून महोत्सवात शास्त्रीय संगीत, लोकगीते, भारुड, पोवाडे, चित्रपट गीते, नाट्य गायनासह गीतरामायण, लाईव्ह ईन कॉन्सर्ट, शिवकल्याण राजा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

संगीत महोत्सवाचा प्रारंभ मंगळवार, दि. ९ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता प्रख्यात कलाकार महेश काळे यांचा महेश काळे लाईव्ह कॉन्सर्ट या कार्यक्रमाने होणार आहे. त्यापूर्वी चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढीपाडव्याला सकाळी ९ वाजता मंदिरामध्ये परिमंडळ१ चे पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल यांच्या हस्ते गुढीपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. संगीत महोत्सवात बुधवार, दि. १० एप्रिल रोजी गणेश चंदनशिवे यांचा महाराष्ट्राचा लोकमेळा हा महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीवर आधारित कार्यक्रम होईल. गुरुवार दि. ११ एप्रिल रोजी प्रख्यात गायक व संगीतकार श्रीधर फडके यांचा गीतरामायण कार्यक्रम रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. शुक्रवार दि. १२ एप्रिल रोजी संगीत महोत्सवात प्रथमच गायक अवधूत गुप्ते यांचा लाईव्ह ईन कॉन्सर्ट कार्यक्रम होणार आहे. महोत्सवाचा समारोप पं.हृदयनाथ मंगेशकर यांच्या शिवकल्याण राजा या कार्यक्रमाने होणार असून यामध्ये विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर हे देखील सहभागी होणार आहेत. रसिकांसाठी वाहने पार्किंगची व्यवस्था आप्पा बळवंत चौकातील प्रभात थिएटर समोरील नू.म.वि.प्राथमिक शाळेत करण्यात आली आहे. संगीत महोत्सव रसिकांसाठी विनामूल्य खुला असून पुणेकरांनी मोठया संख्येने महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत २८ किलो एकल वापर प्लास्टिक जप्त

## ९० हजार रुपयांचा दंड वसूल



शहरात एकल वापर प्लास्टिकच्या कारवाईबाबत सातत्य असायला हवे. विविध उपनगरांत, बाजारपेठांमध्ये आजही खुल्या पध्दतीने एकल प्लास्टिक वापर होत असल्याने पालिकेच्या सातत्याने कारवाई झाली तरच एकल वापर प्लास्टिकवर निर्बंध येतील.
- जिग्नेश पटेल, वाशी

■नवी मुंबई, भावना जैन :

एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमेअंतर्गत मागील आठवड्यात सर्व विभागीय कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी तपासणी करण्यात आली तसेच धडक कारवाई करीत दंडात्मक कारवाई तसेच प्लास्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली. यामध्ये एकूण ९० हजार रुपये दंडात्मक रक्कम तसेच २८ किलो ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र एकल वापर प्लास्टिकमुक्त असावे याहष्टीने महापालिकेकडून वारंवार जनजागृती करण्यासोबतच प्रतिबंधात्मक मोहिमा राबविल्या जात आहेत. परंतू शहरात एकल वापर पिशव्यांचा सर्रास उपयोग केला जात आहे. सर्व विभाग कार्यक्षेत्रात एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमा संबंधित विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या माध्यमातून राबविल्या जात असतानाही एकल वापर पिशव्यांच्या उपयोगावर कधी नियंत्रण येणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा पालिकेच्या कारवाईत बेलापूर विभागात ४ व्यावसायिक आस्थापनांवर कारवाई करीत २० हजार रुपये दंडात्मक रक्कम व ७ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहेत तर नेरूळ विभागात २ व्यावसायिक आस्थापनांवर कारवाई करीत १० हजार दंडात्मक रक्कम व ४ किलो एकल वापर प्लास्टिकची जप्ती पालिकेकडून करण्यात आली आहे. वाशी विभागातही ३ व्यावसायिक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली व त्यामध्ये १५ हजार दंड वसूली व ३ किलो प्लास्टिक जप्ती करण्यात आली. तुर्भे विभागात ३ व्यावसायिकांवरील कारवाईत १५ हजार दंडात्मक रक्कम वसुली आणि ८ किलो एकल वापर प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला आहे.

कोपरखैरणे विभागातील कारवाईत १० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि २.५ किलो प्लास्टिक साठा जप्ती २ व्यावसायिकांकडून करण्यात आली आहे. घणसोली विभागातून १ व्यावसायिकावर कारवाई करीत ५ हजार रक्कमेची दंडवसूली व १ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. शहरात आजही मोठ्या प्रमाणात एकल प्लास्टीक पिशव्यांचा वापर केला जात आहे. ऐरोली विभागातही १० हजार दंडात्मक रक्कम आणि २ किलो ३०० ग्रॅम प्लास्टिक साठा २ व्यावसायिकांकडून जप्त करण्यात आला आहे. याशिवाय परिमंडळ २ च्या भरारी पथकाने १ व्यावसायिकाकडून ९०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्ती आणि ५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केलेली आहे. अशा प्रकारे नवी मुंबई महापालिकेने ९० हजार दंडात्मक रक्कम वसूली तसेच २८ किलो ७०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिकचे साहित्य १८ व्यावसायिक आस्थापना यांच्याकडून जप्त करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेच्या वतीने ही प्लास्टिक वापर प्रतिबंधात्मक कारवाई अशीच सुरू राहणार असून नागरिकांनीही एकल वापर प्लास्टिक वापर पूर्णपणे थांबवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# बेस्ट बस मधील ६४ हजार फुकट्या प्रवाशांकडून ४० लाख रुपये दंड वसूल



महिना - विनातिकीट प्रवासी - दंडवसुली
जानेवारी - २५,०७९ - १५.४० लाख रुपये
फेब्रुवारी - २१,२४७ - १२.९८ लाख रुपये
मार्च - १८,२६८ - ११.१३ लाख रुपये

■मुंबई, विशाल पाटील,

मुंबईतील रस्ते मार्गावरील प्रवाशांची जीवनवाहिनी अशी बेस्ट बसची ओळख बनली आहे. मुंबईच्या पूर्व - पश्चिम उपनगरांना आणि घरांपासून काही अंतरावर बेस्ट सेवा जोडली गेल्याने, स्वस्त आणि वेगवान सेवा असल्याने बेस्टमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

मात्र, अनेक प्रवासी तिकिटांचे ५ ते २५ रुपये वाचविण्यासाठी तिकीट काढत नाही. त्यामुळे त्यांना ६६ रुपये ते २०० रुपयांपर्यंत दंड भरावा लागला आहे. गेल्या तीन महिन्यांत बेस्टमधील ६४ हजारांहून अधिक विनातिकीट प्रवाशांना पकडून ४० लाख रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात सध्या २ हजार ९१६ बस असून यामधून दररोज ३३ ते ३४ लाख प्रवासी प्रवास करतात. बस प्रवाशांची संख्या वाढत असताना, या गदीर्तून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत असून उत्पन्नात घट होत असल्याचे बेस्ट उपक्रमाच्या निदर्शनास आले. त्यामुळे जानेवारी २०२४ पासून बेस्ट उपक्रमाच्या बसमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरूद्ध बेस्ट उपक्रमाने विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. याअंतर्गत बेस्ट उपक्रमाने मुंबईच्या गर्दीच्या बसस्थानकांवर अतिरिक्त तिकीट निरीक्षकांची नेमणूक केली. या पथकामध्ये एकूण ३८२ निरीक्षकांची तिकीट तपासणीसाठी मुंबईच्या वेगवेगळ्या गर्दीच्या ठिकाणी नेमणूक केली. त्याद्वारे जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत ६४ हजार ५९४ विनातिकीट प्रवाशांना पकडून त्यांच्याकडून ३९ लाख ५१ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

बेस्टचे वातानुकूलित प्रवासाचे किमान तिकीट दर ६ रुपये ते कमाल २५ रुपये आहे. तर, विनावातानुकूलित बसचे किमान तिकीट दर ५ रुपये आणि कमाल २० रुपये आहे. मात्र तरीही अनेक प्रवासी वाहक नसल्याचे पाहून, बिनधास्तपणे विनातिकीट प्रवास करतात. अशा प्रवाशांना रोखण्यासाठी बेस्ट उपक्रमाने तिकीट तपासणी पथक तयार केली. सध्या बेस्ट उपक्रमाकडून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून देय असलेले प्रवास भाडे, अधिक प्रवासी भाड्याच्या रकमेच्या दहापट एवढी रक्कम दंड म्हणून आकारण्यात येते. दंड भरण्याचे नाकारल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाते, अशी माहिती बेस्ट उपक्रमाकडून देण्यात आली.

# ७७३ जणांचे कल्याण डोंबिवलीत रिव्हॉल्वर केले जप्त... लोकसभा निवडणुकीत पोलीस ॲक्शन मोडवर

■ठाणे, रोहित जैसवाल,

लोकसभा निवडणूकीची आचार संहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहिता लागू झाल्यापासून कल्याण पोलिस परिमंडळाने विविध पोलीस कारवाई सुरु केली आहे. निवडणूक गुन्हेगारी आणि भयमुक्त पार पाडण्याकरीता ही कारवाई केली जात आहे. कल्याण डोंबिवलीतील ७७३ जणांकडील रिव्हॉल्वर जप्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. फेब्रुवारी महिन्यात कल्याण पूर्वेतील भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी द्वारली येथील जमीनीच्या वादातून उल्हासनगर येथील हिल लाईन पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस निरिक्षकांच्या दालनातच कल्याण शिंदे शिवसेनेच्या शहर प्रमुखावर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली होती.


या घटनेनंतर कल्याण डोंबिवलीसह ठाणे जिल्ह्यात





किती जणांना रिव्हॉल्वर दिलं आहे, याची चर्चा सुरु झाली. कल्याण पोलिस परिमंडळाच्या हद्दीत १ हजार ३८५ जणांकडे अग्नीशस्त्र आहे. त्यांनी पोलिस परवानगी घेऊन रिव्हॉल्वर बाळगले आहे. १६ मार्चपासून लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून पोलिसांनी १ हजार ३८५ जणांपैकी ७७३ जणांकडील अग्नीशस्त्र निवडणूक काळापूरते जप्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित अग्निशस्त्रे जप्त करण्याची कारवाई सुरू आहे. रिव्हॉल्वर जप्त करण्यात आलेल्यांमध्ये राजकीय मंडळीची संख्या जास्त आहे. पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांनी सांगितले की, २०१९ साली कल्याण पोलिस परिमंडळाने ५२४ जणांच्या विरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली होती. यंदा २०२४ सालच्या लोकसभा निवडणूकीकरीता १ हजार १६५ जणांच्या विरोधात कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यापैकी ५९३ जणांच्या विरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ११९ जणांच्या विरोधात अजामीन पात्र स्वरुपाची कारवाई करुन त्यांची कारागृहात रवानगी केली आहे. या विविध स्वरूपाच्या कारवाईत सीआरपीसी, महाराष्ट्र पोलिस कायदा आणि एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

# राज्यात उष्माघाताचा २३ जणांना त्रास आरोग्य विभागाकडून सावधतेचा इशारा



थकवा, चक्कर येणे, उत्साह न वाटणे, अस्वस्थता वाढणे, श्वास घेण्यात त्रास होणे, जीभ आतमध्ये ओढल्यासारखी होणे, रक्तदाब वाढणे, शुद्ध हरपणे

■मुंबई, दिगंबर जाधव :

उष्म्याचा तडाखा सामान्यांना बसण्यास सुरुवात झाली असून, मार्च महिन्यात राज्यात २३ जणांना उष्माघाताचा फटका बसला. अमरावतीमध्ये तिघांना, तर पुणे, रायगड, कोल्हापूर येथे दोघांना उष्माघाताचा त्रास झाला. त्यात ठाणे येथील एकाचा समावेश असून, मुंबईमध्ये मात्र एकही नोंद नाही. अहमदनगर, अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, जळगाव, नांदेड, सातारा, ठाणे येथे एका व्यक्तीला, तर बुलढाणा, बीड, कोल्हापूर, पुणे, रायगड येथे दोघांना उष्माघाताचा त्रास झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. मार्च महिन्यात एकूण २३ जणांना वाढलेल्या उष्णतेमुळे आरोग्याच्या समस्या उद्भवल्या. राज्यात गेल्या वर्षी १ मार्च ते ३१ जुलै या कालावधीत उष्माघातामुळे २२ जणांचा मृत्यू झाला होता. त्यातील सर्वाधिक म्हणजे १३ मृत्यूंची नोंद ही औरंगाबाद जिल्ह्यात झाली होती.

यंदा १ ते २० मार्च या कालावधीत उष्माघाताच्या १३ रुग्णांची नोंद झाली होती. त्यात सर्वाधिक म्हणजे चार रुग्ण हे बीड जिल्ह्यातील होते. त्यापुढील आठ दिवसांत म्हणजे २८ मार्चपर्यंत आठ नव्या रुग्णांची नोंद झाली. या कालावधीत एकाही रुग्णमृत्यूची नोंद नाही. राज्यात २०२०-२१ मध्ये उष्माघातामुळे एकही मृत्यू झालेला नाही. २०१६ मध्ये १९ तर २०१७ मध्ये १३ रुग्णांचा मृत्यू झाला होता. २०१८ नंतर मात्र हे प्रमाण कमी झाले होते. २०१८ आणि २०१९ मध्ये अनुक्रमे दोन आणि नऊ रुग्णांचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याची नोंद आहे.

उष्णतेशी निगडित आजारांच्या औषधांची उपलब्धता रुग्णालयामध्ये ठेवावी. उष्माघाताचा त्रास झालेला रुग्ण येताच त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू करावेत. उच्चरक्तदाब, मधुमेह यासारखे सहआजार असलेल्यांसह लहान मुले, गर्भवती स्त्रिया, ज्येष्ठ नागरिक यांची विशेष काळजी घेण्याकडे आरोग्य विभागाने लक्ष वेधले आहे. कडक उन्हामध्ये बाहेर पडताना काळजी घ्या, दुपारी उन्हाची तीव्रता अधिक असताना गरज असेल तरच बाहेर पडा असेही आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# केडीएमसीची ४२ वर्षांत पहिल्यांदाच विक्रमी कर वसुली, ६२२ कोटींचा टप्पा पार

प्रभाग क्षेत्रनिहाय झालेला करभरणा
अ वॉर्ड - ८७ कोटी ९४ लाख
इ वॉर्ड - ११२ कोटी ६६ लाख
उ वॉर्ड - ६१ कोटी ३४ लाख
ऊवॉर्ड - ३५ कोटी ५४ लाख
ए वॉर्ड - १२८ कोटी ९९ लाख
ऋवॉर्ड - ३३ कोटी ५२ लाख
ॠवॉर्ड - २८ कोटी ६६ लाख
ऌ वॉर्ड - ४७ कोटी ३९ लाख
कवॉर्ड - 54 कोटी ६५ लाख
ख वॉर्ड - २८ कोटी १८ लाख
एकूण - ३ कोटी हस्तांतरण कर





■कल्याण, नितीन देवळेकर,

कोवीड काळापासून काहीशा आर्थिक गर्तेत सापडलेल्या कल्याण डोंबिवली महापालिकेला यंदाच्या रेकॉर्ड ब्रेक वसुलीमुळे दिलासा मिळाला आहे. यंदाच्या वर्षी केडीएमसीच्या तिजोरीत मालमत्ता कराच्या रूपाने ३१ मार्च २०२४ पर्यंत तब्बल ६२२ कोटींहून अधिक रकमेची भर पडली आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या उत्पन्नाचे मदार हे मालमत्ता व पाणीपट्टी करावर अवलंबून असते . दरवर्षी जेमतेम उद्दिष्ट घटना महापालिकेला यश येते. त्यात कोविड काळानंतर महापालिकेचे आर्थिक परिस्थिती देखील जेमतेम होती.

सन २०२०-२१ या कोवीड काळात महापालिकेच्या इतिहासात त्यावेळी पहिल्यांदाच ४०० कोटींचा टप्पा पार केला. परंतु यंदाच्या वर्षी तर या कर वसुलीने त्याचा रेकॉर्ड ब्रेक करत त्याही पुढचा ६०० कोटींचा टप्पा गाठला आहे. कल्याण डोंबिवली स्थापनेपासून आजपर्यंत गेल्या ४२ वर्षांत इतक्या मोठ्या संख्येने कर वसुली झाली आहे. केडीएमसीने यावर्षी आपल्या दहा प्रभागात मिळून तब्बल ६२२ कोटींपेक्षा अधिकची करवसुली केली आहे.

केडीएमसीच्या ब आणि ई या दोन्ही वॉर्डांनी मिळून २४० कोटींची भर घातल्याचे एकंदर आकडेवारीवरून दिसून येत आहे. तर ६२२ कोटींच्या मालमत्ता करासोबतच पाणीपट्टीचीही ७४ कोटी ७२ लाखांची रक्कम केडीएमसीच्या तिजोरीत जमा झाली असल्याची माहिती मालमत्ता कर विभागाच्या उपायुक्त स्वाती देशपांडे - कुलकर्णी यांनी दिली. या रेकॉर्ड ब्रेक कर वसुलीमुळे आर्थिक गर्तेत सापडलेला कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाला दिलासा मिळाला असून विकास कामांना चालना मिळण्यास मदत होणार आहे असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला.

# स्वच्छतेचे नियम मोडणाऱ्यांना मिळणार ऑनलाइन पद्धतीने दंडाची पावती

■मुंबई, यश सावंत,





सार्वजनिक स्वच्छतेचे नियम मोडणाऱ्यांवर होणाऱ्या दंडात्मक कारवाईत आता तंत्रज्ञानाचा आधार घेतला जाणार आहे. पालिकेच्या 'ए' विभागात स्वच्छतेसंदर्भातील प्रकल्प सुरु करण्यात आला असून आता स्वच्छतेचे नियम मोडणाऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने दंडाची पावती मिळणार आहे. प्रशिक्षित क्लिन अप मार्शल कारवाई करताना आकारलेल्या दंडाची पावती हाताने न लिहिता मोबाईल ॲपद्वारे छापील पावती देणार आहेत. तसेच, नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने दंड भरण्याचाही पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. स्वच्छ मुंबई अभियानांतर्गत अधिकाधिक लोकाभिमुख तसेच तंत्रज्ञानस्नेही पुढाकार घ्यावेत. तसेच, अधिकाधिक पारदर्शक यंत्रणा राबवावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त सुधाकर शिंदे यांनी यंत्रणांना दिले आहेत. त्यानुसार, माहिती तंत्रज्ञानावर आधारित दंडात्मक आकारणीची सुरुवात क्लीन अप मार्शलच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या पथदर्शी प्रकल्पाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन संपूर्ण मुंबईत या तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. स्वच्छताविषयक नियमांचे उल्लंघन केल्यावर होणाऱ्या दंडात्मक वसूलीसाठी डिजीटल व ऑनलाईन पद्धतीने कार्यवाही करण्याचे मोबाईल ॲप महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने तयार केले आहे. प्रत्येक प्रशासकीय विभागात ३० याप्रमाणे संपूर्ण मुंबईत मिळून सुमारे ७०० क्लीन अप मार्शल कार्यरत आहेत. या सर्वांना प्रशिक्षण देऊन प्रायोगिक तत्त्वावर डिजीटल कारवाई सुरु करण्यात येणार आहे. तसेच, कार्यवाही डिजीटल झाल्यामुळे महानगरपालिकेला कोणत्या दिवशी किती रक्कम दंड आकारणी झाली, कोणत्या जागेवर, कोणत्या विभागात, कोणत्या प्रकारासाठी दंड आकारणी झाली, याचे अचूक तपशील कळू शकतील. नागरिकांना मिळालेल्या पावतीवर महानगरपालिकेचे बोधचिन्ह तसेच पावती क्रमांक असेल. महानगरपालिकेच्या विभागाचे नाव, दिनांक, वेळ तसेच कारवाई केलेल्या जागेचा अक्षांश, रेखांशदेखील असेल. परिणामी, दंड आकारणी प्रक्रियेतील गैरव्यवहार रोखले जातील. तसेच, नागरिक आणि मार्शल यांच्यातील वादाचे प्रसंगही टळतील. क्लीन अप मार्शलकडे असलेल्या मोबाईलमध्ये महानगरपालिकेने तयार केलेले क्लीन अप मार्शल सिस्टीम ॲप असेल. यामध्ये स्वच्छतेचे नियम मोडल्याबद्दल आकारावयाची निश्चित रक्कम आधीपासूनच समाविष्ट असेल. सध्याच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे किमान १०० रुपए, तर कमाल १ हजार रुपए इतका दंड आकारण्याचे अधिकार क्लिन अप मार्शल यांना असणार आहेत. नागरिकांनी या योजनेला सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. सुधाकर शिंदे यांनी व्यक्त केले.

# सी-व्हीजील ॲपवर १८ दिवसात १३३ तक्रारींचा अक्षरक्ष: पाऊस

■ठाणे, सचिन कदम,



लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या या ॲपवर अवघ्या १८ दिवसात १३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून यामध्ये ४ त्कारारी या लेखी स्वरूपातील आहे. त्यापैकी ३४ तक्रारींचा अवघ्या १०० मिनिटात निपटारा करण्यात आला आहे. या ॲपवर तक्रारी करतांना सेल्फी फोटो काढून अपलोड करण्यात आले असल्याचे देखिल आढळून आल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाच्यावतीने देण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या घोषणेमुळे ठाणे जिल्ह्यातही आदर्श आचारसंहिता लागू झाली असून तिचे काटेकोर पालन करण्यासाठी जिल्हा निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. जिल्ह्यातील तीन लोकसभा मतदार संघासाठी २० मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागून करण्यात आली असून त्याचे काटेकोर पालन करण्यासाठी आदर्श आचारसंहितेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सी व्हिजील या मोबाईल ॲपचा वापर करण्यात येत आहे. नागरिकांना एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्या प्रसंगाचे या ॲपमध्ये छायाचित्र अथवा व्हीडीओ काढून तक्रार नोंदविली जात आहे. या तक्रारी नोंदविताना अनेकदा तक्रारदार हे त्या प्रसंगाचे फोटो काढून तो दुसऱ्या ठिकाणाहून अपलोड करत आहे. त्यामुळे तक्रारींचा निपटारा करण्यासाठी अधिकचा वेळ खर्ची पडत आहे. असे असले तरी, सी - व्हीजील ॲपवर प्राप्त झालेल्या १३३ तक्रारींपैकी ३४ तक्रारींचा १०० मिनिटात निपटारा करण्यात आला आहे. तर, १०३ तक्रारींवरील कारवाई पूर्ण करून तक्रारी निकाली काढण्यात आल्या असल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली. १६ मार्च पासून लागू झालेल्या आचारसंहिता भंगाच्या आतापर्यंत १८ दिवसात सी व्हिजील ॲपवर १३३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ३४ तक्रारी अवघ्या १०० मिनीटात कारवाई करण्यात आली. या तक्रारींमध्ये राजकीय पोस्टर, फलकबाजी तसेच मोबाईलवरील जाहिराती आदींचा समावेश आहे.

## पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..



# सुंदर लिप्ससाठी टिप्स !

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**

**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

▮रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

▮बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

▮डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

▮जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

▮जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

▮ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.



## उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



## खानपानच्या ५ असंगत जोड्या सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व काबोर्नेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्भवू लागतात.



## बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून

बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.

**मसाजचे फायदे-**

▮ मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

▮दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

▮मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

▮ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

▮मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

▮मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

▮मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.



## पॅनकार्डमधील या दोन चुका पडतील भारी, १० हजारांचा दंड आणि ६ महिन्यांची शिक्षा

**पॅन कार्डला आधार कार्ड लिंक करण्यासाठी ३१ मार्च २०२३ पर्यंत डेडलाइन दिली आहे. ३१ मार्चआधी तुम्ही जर हे काम केले नाही तर तुम्हाला चांगलेच महागात पडू शकते. कारण, काही गोष्टी या तुम्हाला माहिती असणे आवश्यक आहे. जाणून घ्या डिटेल्स.**

**गेल्या** काही दिवसांपासून सतत ऐकायला मिळत आहे. पॅनकार्डला आधार कार्डशी लिंक करणे गरजेचे आहे. ही लिंक करण्याची अखेरची तारीख ३१ मार्च २०२३ आहे. आता पॅन संबंधी आणखी एक माहिती समोर येत आहे. जर कुणी सरकारच्या या आदेशाचे पालन केले नाही तर त्याला मोठा दंड भरावा लागू शकतो. जर तुम्ही सरकारकडून देण्यात आलेल्या आदेशाला मानले नाही ज्याला पॅन आणि आधार कार्डला लिंक करण्यास सांगितले आहे. असे करणे बंधनकारक आहे. परंतु असे केले नाही तर तुम्हाला दंड भरावा लागू शकतो.

**१० हजारांचा दंड**

इनकम टॅक्स डिपार्टमेंटच्या माहितीनुसार, जर तुम्ही ३१ मार्च आधी आधार पॅनला लिंक केले नाही तर त्या व्यक्तीला १० हजार रुपयांचा दंड भरावा लागू शकतो. तसेच ३१




मार्चनंतर ज्यांचे पॅन आणि आधार लिंक होणार नाहीत. त्या पॅन कार्डला बंद केले जाईल. त्यामुळे तुमचे पॅन कार्डचे सर्व कामे खोळंबली जाऊ शकतात. त्यामुळे तुम्ही ही कामे तत्काळ करून घ्यायला हवीत.

**जेलही होऊ शकते**

जर तुमच्याकडे दोन पॅन कार्ड सापडले तर तुम्हाला जेलची हवा सुद्धा खावी लागू शकते. असे करणे गुन्हा आहे. जर तुमच्याकडे दोन पॅन कार्ड असल्यास तुम्हाला एक पॅन कार्ड सरेंडर करावे लागेल. जर तुम्ही असे केले नाही तर तुम्हाला यासाठी ६ महिन्यांची जेलची शिक्षा होऊ शकते.

## पंजाबी गाण्यावर एन्ट्री, फुलांची उधळण अन्... तापसी पन्नूच्या सिक्रेट लग्नातील पहिला व्हिडीओ आला समोर

बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जवळच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत तिने बॉयफ्रेंड मॅथियस बोशी लग्न केल्याचं वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. परंतु, यावर तापसीने कुठेही अधिकृतपणे भाष्य केलं नव्हतं. यामुळे नेमकं तिचं लग्न झालंय की नाही? याबाबत साशंकता निर्माण झाली होती. अशातच तिच्या लग्नातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने तापसी लग्नबंधनात अडकल्याचं अखेर स्पष्ट झालं आहे.

जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीमध्ये तापसी राजस्थानमधील उदयपूरमध्ये विवाहबंधनात अडकली आहे. वरमाला विधीसाठी अभिनेत्रीने लग्नमंडपात थाटामाटात एन्ट्री घेतली होती. लाल रंगाचा भरजरी पंजाबी ड्रेस, डोळ्यावर गॉगल, हातात लग्नाचा चुडा अशा खास अंदाजात तापसी मंडपात आली होती.


तापसी पन्नूने लग्नसमारंभात पंजाबी गाण्यावर एन्ट्री घेतल्याचं पाहायला मिळालं. नववधूच्या रुपात ती अतिशय सुंदर दिसत होती. तसेच मॅथियस बोने देखील यावेळी पारंपरिक लूक केला होता. एकमेकांना वरमाला घातल्यावर या जोडप्यावर सगळ्यांनी फुलांची उधळण केली. तापसीच्या लग्नातील हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांनी अभिनेत्रीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अजूनही तापसीने लग्नाबाबत कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही.

दरम्यान, तापसी माजी बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर जवळपास दहा वर्षांपासून रिलेशनशिप होती. आता या जोडप्याने लग्न केलं आहे. अनुराग कश्यप आणि कनिका ढिल्लों हे दोघे तिच्या लग्नाला उपस्थित होते. याआधी दिलेल्या वृत्तानुसार तापसी आणि




मॅथियसचा लग्नसोहळा २३ मार्च रोजी पार पडला आहे. आता तापसी अधिकृतपणे लग्नाची घोषणा केव्हा करणार याकडे तिच्या चाहत्यांचं लक्ष लागलं आहे.

## इन्स्टाग्रामवरील 'या' रीलमुळे मृण्मयी देशपांडेला 'स्वरगंधर्व सुधीर फडके' चित्रपटात मिळाली भूमिका, म्हणाली, "माझ्याबाबतीत..."




सुप्रसिद्ध संगीतकार, गायक सुधीर फडके ऊर्फ बाबूजी यांच्या जीवनावर आधारित 'स्वरगंधर्व सुधीर फडके' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात सुधीर फडके यांच्या भूमिकेत सुनील बर्वे, तर त्यांच्या पत्नी ललिताबाई फडके यांच्या भूमिकेत अभिनेत्री मृण्मयी देशपांडे पाहायला मिळणार आहे. 'स्वरगंधर्व सुधीर फडके'मधील ललिताबाई फडके यांची भूमिका मृण्मयी देशपांडेला एका रीलमुळे मिळाली, याचा खुलासा तिने स्वतः केला आहे.

अलीकडेच 'स्वरगंधर्व सुधीर फडके' चित्रपटाचा पोस्टर लाँच सोहळा थाटामाटात पार पडला. यावेळी 'राजसी मराठी' या एंटरटेनमेंट युट्यूब चॅनलशी बोलताना मृण्मयीने चित्रपटातील आपल्या भूमिकेविषयी सांगितलं. तिला विचारलं की, या चित्रपटाची सुरुवात एकंदरीत कशी होती? तेव्हा मृण्मयी म्हणाली, ''सुरुवात खूप धमाल झाली. माझ्याबाबतीत अशी सुरुवात याच्याआधी कधीच घडली नव्हती. मी सहज एकेदिवशी साडी नेसून लांब केसांची वेणी घालत रील केली होती. मी ती रील इन्स्टाग्रामवर सहज पोस्ट केली. त्या रीलला मी बाबूजींचं गाणं वापरलं होतं.''

''ती रील पोस्ट केल्यानंतर मला दोन दिवसांत योगेश देशपांडेंचा फोन आला. मृण्मयी आम्ही तुझाच विचार करत होतो आणि तुझी ती रील पाहिली, जी पोस्ट केली आहेस. त्यामुळे आम्हाला असं वाटतं की, तू ललिताबाईच्या भूमिकेसाठी शोभून दिसशील. तुला करायला आवडेल का? अर्थातच नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. कधी कधी असं असतं की आपण काही भूमिका निवडतो आणि कधी कधी असं होतं की, काही भूमिका आपल्याला निवडतात. तर तसंच यावेळेस माझ्याबरोबर झालं. मला भूमिकेने निवडलं,'' असं मृण्मयी म्हणाली.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | | 3 | 7 | | | |
| 1 | | | 6 | 5 | | | | 9 |
| 4 | 5 | 3 | | 1 | 2 | | | 8 |
| 2 | 7 | | | | 6 | | | |
| | 9 | 4 | | 7 | | | | 2 |
| 6 | | | | 9 | | | | |
| | | | 3 | | | 7 | 8 | 1 |
| | 6 | | 5 | | 1 | 2 | 3 | |
| 8 | | | | 2 | | | | |

### उत्तर सुडोकू -४६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 5 | 3 | 4 | 7 | 8 | 1 | 9 |
| 8 | 9 | 4 | 1 | 5 | 6 | 2 | 3 | 7 |
| 3 | 1 | 7 | 8 | 9 | 2 | 4 | 5 | 6 |
| 9 | 5 | 8 | 6 | 7 | 3 | 1 | 2 | 4 |
| 7 | 3 | 6 | 2 | 1 | 4 | 5 | 9 | 8 |
| 1 | 4 | 2 | 9 | 8 | 5 | 6 | 7 | 3 |
| 4 | 8 | 3 | 5 | 2 | 9 | 7 | 6 | 1 |
| 6 | 2 | 1 | 7 | 3 | 8 | 9 | 4 | 5 |
| 5 | 7 | 9 | 4 | 6 | 1 | 3 | 8 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### ४ एप्रिल

- ◆१८८२: ब्रिटन च्या पहिल्या इलेक्ट्रिक ट्राम ईस्ट लंडन मध्ये चालू झाल्या.
- ◆१९४४: दुसरे महायुद्ध ब्रिटिश व अमेरिकन फौजांनी रुमानियातील बुखारेस्टवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात ३००० नागरिक ठार झाले.
- ◆१९४९: पश्चिम युरोपातील अकरा देश आणि अमेरिका अशा १२ देशांनी नाटो या संस्थेची स्थापना केली.
- ◆१९६८: जेम्स अर्ल रे यांनी मार्टिन ल्यूथर किंग (ज्यु.) यांची हत्या केली.
- ◆१९६८: नासाने अपोलो-६ चे प्रक्षेपण केले.
- ◆१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यात आला.
- ◆१८२३: जर्मन-ब्रिटिश विद्युत अभियंता सर कार्ल विल्हेम सीमेन्स यांचा जन्म. (मृत्यू: १९ नोव्हेंबर १८८३)
- ◆१८४२: फ्रेंच गणिती एडवर्ड लुकास यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑक्टोबर १८९१)
- ◆१८९३: पायोनियर इन्स्ट्रुमेंट कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स हर्बर्ट कॉल्विन यांचा जन्म. (मृत्यू: ३ जुलै १९८५)
- ◆१९०६: फिशर इलेक्ट्रॉनिक्स चे स्थापक एवेरी फिशर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९९४)
- ◆१९०२: ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक पं नारायणराव व्यास यांचा जन्म. (मृत्यू: १ एप्रिल १९८४)
- ◆१९२६: ॲमवे कंपनी चे सहसंस्थापक रिचर्ड डेवोस यांचा जन्म.
- ◆१९३३: डावखुरे मंदगती गोलंदाज बापू नाडकर्णी यांचा जन्म.
- ◆१९७३: भारतीय संचालक आणि पटकथालेखक चंद्र शेखर येलेती यांचा जन्म.
- ◆१६१७: स्कॉटिश गणितज्ञ आणि लॉगॅरिथम सारणीचे जनक जॉन नेपिअर यांचे निधन.
- ◆१९२३: ब्रिटिश गणितज्ञ जॉन वेन यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८३४)
- ◆१९२९: मर्सिडीज-बेंझ कंपनीचे संस्थापक कार्ल बेन्झ यांचे निधन. (जन्म: २५ नोव्हेंबर १८४४)
- ◆१९३१: फ्रेन्च उद्योगपती आंद्रे मिचेलिन यांचे निधन. (जन्म: १६ जानेवारी १८५३)
- ◆१९६८: नोबेल पारितोषिक विजेते मार्टिन ल्यूथर किंग (ज्युनियर) यांची हत्या झाली. (जन्म: १५ जानेवारी १९२९)
- ◆१९७९: पाकिस्तानचे चौथे राष्ट्राध्यक्ष आणि ९ वे पंतप्रधान झुल्फिकार अली भत्तो यांचे निधन. (जन्म: ५ जानेवारी १९२८)
- ◆१९८७: ज्ञानपीठ पारितोषिक विजेते हिंदी लेखक आणि वृत्तपत्रकार सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन उर्फ अज्ञेय यांचे निधन. (जन्म: ७ मार्च १९११- खुशीनगर, देवरिया, उत्तर प्रदेश)
- ◆१९९६: संस्कृत आणि मराठी साहित्यिक आनंद साधले यांचे निधन. (जन्म: ५ जुलै १९२०)
- ◆२०००: कलादिग्दर्शक वसंतराव कृष्णाजी गोंधळेकर यांचे निधन.

## भविष्य

**मेष** हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

**वृषभ** कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

**मिथुन** सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

**कर्क** अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

**सिंह** यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं. विचित्र अडचणी

**कन्या** बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

**तुला** प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपकार्मुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

**वृश्चिक** फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळवातार्लापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठा नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

**धनु** उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

**मकर** आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

**कुंभ** शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल. प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

**मीन** अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.


Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# त्रिकोणाच्या त्रांगड्याची त्रेधा!

डोळ्यांस पट्टी बांधून 'राज्य' घेण्यासही अनेक इच्छुक आणि ज्याच्यावर 'राज्य' आहे त्यास बिलगण्यासही अनेक इच्छुक; अशी स्थिती महाराष्ट्रात सध्या आहे... महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय घडामोडींची तुलना आंधळी कोशिंबीर या खेळाशी होऊ शकेल. अर्थात या खेळात एक निरागसता असते. ती सध्याच्या राजकीय हालचालींत अजिबात नाही. उलट निरागसतेच्या अगदी विरोधी भावना या राजकीय कोशिंबिरीत शिगोशीग भरलेली दिसते. आणखी एक फरक या आणि निरागस आंधळ्या कोशिंबिरीत आढळेल. या खेळात ज्याच्यावर 'राज्य' असते त्याच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यास इतरांना स्पर्शून 'बाद' करावे लागते. राजकीय आंधळ्या कोशिंबिरीतील चित्र याच्या बरोबर उलट. लहानग्यांच्या या खेळात 'राज्य' कसे आपल्यावर येणार नाही, यासाठी स्पर्धा असते. येथे सर्व प्रयत्न राज्य आपल्यालाच कसे मिळेल याचे. त्यासाठी अनेक स्पर्धक स्वतःच्याच डोळ्यांस पट्टी आणि गुडघ्यांस बाशिंग बांधून तयार. लहानग्यांच्या आंधळ्या कोशिंबिरीत ज्यावर 'राज्य' येते त्याच्यापासून स्वतःस दूर राखण्याचा प्रयत्न अन्य स्पर्धकांचा असतो. येथे ही बाबही अगदी उलट. ज्याच्यावर राज्य आहे त्याच्या हातास आपण कसे लवकरात लवकर लागू असाच स्पर्धक खेळाडूंचा प्रयत्न या राजकीय आंधळ्या कोशिंबिरीत दिसतो. यामुळे एक विचित्र कुंठितावस्था राज्याच्या राजकारणात आलेली दिसते. डोळ्यांस पट्टी बांधून 'राज्य' घेण्यासही अनेक इच्छुक आणि ज्याच्यावर 'राज्य' आहे त्यास बिलगण्यासही अनेक इच्छुक; अशी ही विचित्र परिस्थिती. तिची दखल घ्यावी लागते याचे कारण हे असले बाल-शिशू राजकारण महाराष्ट्र पहिल्यांदाच अनुभवत असावा म्हणून. यास जबाबदार एकमेव घटक. केंद्रीय यंत्रणांच्या सौजन्याने सत्ताधाऱ्यांच्या दबावास बळी पडून आपलेच घर स्वहस्ते भेदून घेणारे राजकीय नेते. याआधी महाराष्ट्राने कधी पक्षांतरे पाहिली नाहीत असे नाही. खुद्द बाळासाहेब ठाकरे हयात असतानाही शिवसेना फुटली आणि काँग्रेसच्या फुटींची तर मोजदाद नाही. तीच गत काँग्रेसच्या मुळांतून जन्मास आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीही. तथापि गेल्या दोन वर्षांत जे काही झाले ते अभूतपूर्व होते. स्वतः अन्य पक्षांत जाण्याऐवजी पक्ष संस्थापकांनाच घराबाहेर काढण्याचा प्रयत्न एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी अनुभवला. त्याच्या बऱ्यावाईटाची चर्चा करण्याचे कारण नाही. राजकारणात प्रत्येक शेरास सव्वाशेर भेटत असतो या 'न्यायाने' जे काही झाले ते झाले. तथापि जे काही झाले त्याचा परिणाम असा की भाजपेच्छुक आणि भाजप-मार्गे सत्ताइच्छुक नेत्यांची संख्या कमालीची वाढली. एखाद्या छिद्र पडलेल्या होडीतील प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी त्यातल्या त्यात बऱ्या नौकेचा आधार घ्यावा आणि अशा आधार शोधणाऱ्यांची संख्या हाताबाहेर गेल्याने ती बरी नौकाही बाग-बुग करू लागावी असे भाजपचे होत असावे. त्या पक्षाकडे हौशे, नवशे, गवशे गर्दी करत होतेच. पण आता ज्येष्ठांतही ती स्पर्धा सुरू झाली असून भाजपच्या नौकेचे रूपांतर मुंबईतील गर्दीकालीन लोकलच्या डब्यात होते की काय, असे वाटण्याजोगी परिस्थिती दिसते. भाजपचे 'श्री' हे निवडणुकांचे कार्य सिद्धीस नेण्यास निःसंशय समर्थ आहेत हे खरे. पण त्यामुळे परिस्थितीचा गुंता उलट आणखी वाढतो. कसे ते लक्षात घ्यायला हवे. उदाहरणार्थ ठाणे हा मतदारसंघ. हे उपनगर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यक्षेत्र. त्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात मुख्यमंत्र्यांच्या पक्षाचाच उमेदवार असावा ही अपेक्षा काही गैर नाही. खरे तर ही अगदी किमान अपेक्षा. पण मुख्यमंत्री असूनही शिंदे यांस ही साधी इच्छाही अद्याप तरी पूर्ण करता आलेली नाही. त्यांच्या पक्षाकडे उमेदवार नाही; सबब ही जागा आम्हास द्या असा भाजपचा युक्तिवाद. यातील पहिला भाग खराच. पण या निवडणुकांत पंतप्रधानांचा चेहरा हा एकमेव घटक निर्णायक ठरणार असेल तर शिंदे गटातील हा उभा राहिला काय किंवा तो राहिला काय? अखेर हा विजय भाजपचाच असणार. तेव्हा भाजपने इतके ताणायचे आणि स्वतःच आयात केलेल्या, स्वतःच प्राणप्रतिष्ठा केलेल्या 'आपल्याच' मुख्यमंत्र्यांवर ही वेळ का आणायची? वास्तविक प्रतिपक्षासही स्वमिठीत घेण्याच्या भाजपच्या अलीकडे वारंवार दिसू लागलेल्या दुर्मीळ गुणांमुळे राष्ट्रवादीचे एके काळी भ्रष्टाचारी म्हणून हिणवले गेलेले, यांना पाडा असे आवाहन ज्यांच्याबाबत देशाच्या सर्वोच्च नेत्याने केले होते असे, ज्यांच्यावर तब्बल ७० हजार कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप होता असे इत्यादी अनेकांस भाजपने उदार अंतःकरणाने प्रेमालिंगन दिले, त्यांना आपले म्हटले. असे असतानाही मग छगन भुजबळ यांच्यासारख्यांस नाशिक मतदारसंघातून उमेदवारी देण्यास भाजपने विरोध का बरे करावा? भले तो असेल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा मतदारसंघ! पण ज्या उदार अंतःकरणाने शिंदे आणि त्यांच्या साथीदारांस भाजपने आपले मानले, ज्या विशाल दृष्टिकोनातून अजित पवार आणि त्यांच्या सिंचन-सवंगड्यास भाजपने पापमुक्त केले, त्यांच्यासाठी भाजपने एवढेही करू नये, ही बाब दुःखदायक! यातून भाजप अन्य पक्षीयांस ते आत येईपर्यंत करकमलांनी कुरवाळतो आणि एकदा का ही मंडळी आत आली की त्यांस पदचरणांनी तुडवाळतो असे चित्र निर्माण होण्याचा धोका आहे. या 'चारसो-पार' जाणाऱ्या महायुतीची ही तऱ्हा. तिचेच प्रतिरूप तीस आव्हान देण्याच्या वल्गना करणाऱ्या महाविकास आघाडीतही दिसून येते. उद्धव ठाकरे यांची 'मशाल' कोणी हाती घ्यावी तर त्याच्या मुखी अचानक 'तुतारी' वाजू लागते आणि ती खाली ठेवावी तर समोर 'पंजा' उभा ठाकतो. त्यामुळे कोणी काय करावे आणि कोण काय करणार, याचा अंदाज अद्याप तरी या आघाडीच्या सूत्रसंचालकांस आहे, असे दिसत नाही. शिवसेना काय करते ते काँग्रेसला केल्यावर कळते आणि राष्ट्रवादी काय करू इच्छितो त्याची पूर्वकल्पना अन्य दोघांस असतेच असे नाही.

# 'एक देश, एक निवडणूक' आणि अनेक प्रश्न



**विद्यमान सरकारला देशात 'एक देश, एक निवडणूक' ही संकल्पना राबवायची आहे. त्यासाठीचा अहवालही राष्ट्रपतींना सादर करण्यात आला आहे. मुळात ही संकल्पना सांविधानिक आहे का? न्यायालयात ती टिकेल का?**

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने नुकताच 'एक देश, एक निवडणूक' संदर्भातील अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला. हा अहवाल संविधानाला अभिप्रेत आहे का? केंद्र सरकार या माध्यमातून आपल्या सांविधानिक मर्यादांचे उल्लंघन करते आहे का? 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेच्या माध्यमातून संविधानातील समानता, सत्तेचे विकेंद्रीकरण, नागरिकांच्या अधिकार यांची पायमल्ली होते आहे का? ही संकल्पना भविष्यात अमलात आली तरी संविधान आणि न्यायालयीन निकषांवर ती कितपत ग्राह्य धरली जाईल, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. येऊ घातलेल्या निवडणुकीच्या घोषणांमध्ये 'एक देशएक निवडणूक' ची भर पडलेली आहे. ('एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेचे शीर्षकच मुळात अयोग्य आहे. कारण संबंधित उच्चस्तरीय समितीने 'एक देश, एक निवडणूक'ऐवजी एकाच वेळी दोन-तीन निवडणुकांची शिफारस केलेली आहे.)

**समितीच्या शिफारशी**

अहवालात निवडणुकीनंतर पाच वर्षांचा कार्यकाल असलेल्या लोकसभेची 'नियुक्ती तारीख' निश्चित करण्याची शिफारस आहे. दरम्यान विधानसभेच्या निवडणुका या लोकसभा अस्तित्वात आल्याच्या तारखेसमवेत सुसंगत ठरतील असे नियोजन व्हावे असे नमूद आहे.

लोकसभेचा कार्यकाळ संपुष्टात येण्याअगोदर अविश्वास प्रस्ताव आणला गेला अथवा बहुमत असतानाही नव्याने जनादेश घेण्याची सत्ताधारी पक्षाला गरज वाटली आणि लोकसभा विसर्जित केली गेली तर नव्याने होणाऱ्या निवडणुकीनंतर अगोदरचा ठरलेल्या पाच वर्षांतील उर्वरित कार्यकाळासाठीच लोकसभा अस्तित्वात येईल.

त्याच प्रकारे एखाद्या राज्याच्या विधानसभेत सत्ताधारी पक्षाने सभागृहाचा विश्वास गमावला अथवा बहुमत असतानाही सत्ताधारी पक्षाला नव्याने जनादेश घेण्याची गरज वाटली आणि विधानसभा विसर्जित केली गेली तर नव्याने होणाऱ्या निवडणुकीनंतर अगोदरचा ठरलेल्या पाच वर्षांतील उर्वरीत कार्यकाळासाठीच विधानसभेचे अस्तितव असेल. संविधानाने बहाल केलेला पाच वर्षांचा कार्यकाळ या समितीच्या शिफारशीने हिरावून घेतला आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्यावर १०० दिवसांत स्थानीय स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा दुसरा टप्पा पार पडेल. थोडक्यात लोकसभा अस्तित्वात आल्याची तारीख निश्चित झाल्यावर, तिथून पुढील पाच वर्षांचा विधानसभा व स्थानीय स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ असेल.

या मुख्य शिफारशी अमलात आणण्यासाठी संबंधित उच्चस्तरीय समितीने संविधानातील अनुच्छेद ८३, १७२, ३२५ व ३२७ तरतुदींच्या बाबतीत घटनादुरुस्ती करण्याचे सुचवले आहे. याव्यतिरिक्त संविधानात नव्याने अनुच्छेद ८२ अ आणि ३२४ अ या नवीन तरतुदींचा समावेश करण्याची सूचना केली आहे. नवीन तरतुदी या अनुक्रमे तारीख निश्चिती आणि संसदेला स्थानीय स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लोकसभा व विधानसभेच्या समवेत घेण्याचे अधिकार प्रदान करतील. एकाच वेळी या सर्व निवडणुकांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय राजधानी दिल्ली प्रांत कायदा १९९१, जम्मू काश्मीर पुनर्रचना कायदा २०१९, केंद्रशासित प्रदेश कायदा १९६३ यातही दुरुस्ती करावी लागेल. उच्चस्तरीय समितीच्या अहवालात केवळ अनुच्छेद ३२४ अ बाबत दुरुस्ती करताना निम्म्या राज्य सरकारांची सहमती संविधानिक दृष्टीने गरजेची आहे. संविधानातील परिशिष्ट सातमधील राज्य सूचीतील राज्य सरकारांच्या अधिकार कक्षेत ती मोडते.

निवृत्त सरन्यायाधीश दीपक मिश्रा व खासदार रंजन गोगोई यांनी 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेला सहमती दर्शवलेली आहे. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने सहमती दर्शवलेली आहे. केंद्रातील सरकारांच्या मदतीला सदैव धावून जाणाऱ्या बिजू जनता दलाकडूनही वेगळ्या भूमिकेची अपेक्षा नव्हती. राजकीय पक्षांची भूमिका बघता बहुतांशी भाजपशी संलग्न पक्षांनीच आपले लेखी समर्थन दिल्याचा अहवालात उल्लेख दिसतो. ज्येष्ठ विधिज्ञ हरीश साळवे हे सध्या सगळ्याच प्रकरणात केंद्र सरकारची वकिली करताना दिसतात; त्यांनीपण समितीचे सदस्य म्हणून या संकल्पनेला सहमती दर्शवलेली आहे.

**संभाव्य असांविधानिक निर्णय**

आपल्या देशातील सध्याची राजकीय परिस्थिती बघता राष्ट्रपती राजवट अनुच्छेद ३५६ आणि परिशिष्ट दहाचा या अहवालात गांभीर्याने विचार होणे गरजेचे होते. सभागृह विसर्जित होण्यासाठी आणि त्यानंतर या तरतुदींच्या आधारे पुढील सांविधानिक प्रक्रिया पार पडते. हे मुख्य विषय विचारात न घेता नव्याने निवडणुका घेण्याची शिफारस अनाकलनीय ठरते. मुदतपूर्व निवडणुका घेतल्या गेल्यास आर्थिक झळ जनतेलाच बसणार आहे. उलट मध्यावधी निवडणुकांना निमित्त ठरणारी पक्षांतरांची उलाढाल ही निवडणूक खर्चापेक्षा कित्येक पटीने अधिक आहे. त्याची अधिकृत आकडेवारी न मोजता येणारी आहे. राष्ट्रपती राजवटीला तीन वर्षांपर्यंत मुदतवाढ देता येते. 'एक देश, एक निवडणूक' अस्तित्वात आल्यास केंद्र सरकारच्या मर्जीवर मध्यावधी निवडणुका घेतल्या जातील अथवा टाळता येतील. भविष्यात 'एक देश, एक निवडणूक' संकल्पनेची अंमलबजावणी झाल्यास या असांविधानिक कृतीची पुनरावृत्ती होणारच नाही, याबाबत अहवाल आश्वस्त करत नाही. परिशिष्ट दहा आणि अनुच्छेद ३५६ हे अप्रत्यक्षपणे 'एक देश, एक निवडणूक' अहवालातील मध्यावधी निवडणुकीशी संबंधित विषय आहेत.

**काही प्रश्न, काही उत्तरे**

स्वातंत्र्यानंतर लगेच झालेल्या निवडणुकांचे अहवालात संदर्भ दिले आहेत. वास्तविक स्वातंत्र्यानंतर अनेक नवीन राज्ये अस्तित्वात आली. त्याच कारणास्तव त्या काळातील निवडणुकांचे प्रमाण आणि आजचे निवडणुकांचे प्रमाण यांची तुलना उदाहरण तर्क म्हणूनही निरर्थक ठरते. मुळात आपली लोकसंख्या, भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थिती बघता एका विधानसभेची निवडणूक एका टप्प्यात घेतली जात नाही. तिथे एकाच वेळी देशातील सार्वत्रिक आणि राज्याच्या निवडणुका किती टप्प्यात घ्याव्या लागतील? त्यासाठी लागणारे मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, यंत्रणा, सामग्री हे वेगळेच. जिथे लोकसभेच्या ५४३ जागांसाठी दीड महिन्याचा कालावधी लागतो आहे तिथे 'एक देश, एक निवडणूक' अमलात आणण्यास वर्षांतील चार ते सहा महिने आचारसंहितेतच जातील याचा विचार करणे गरजेचे आहे. आज शिक्षकांना निवडणूक कामात नियुक्त केले जाते. इतक्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या निवडणुकीसाठी लागणारे कर्मचारी -अधिकारी कंत्राटी पद्धतीनेच आणले जातील का?

**संविधानाचे मूळ तत्त्व**

भारतीय संविधानाने अनुच्छेद ३६८ अंतर्गत केंद्र सरकारला घटनादुरुस्तीचे अधिकार प्रदान केले आहेत. केशवानंद भारती निकालात न्यायालयाने विश्लेषण करताना संविधानाचे मूळ तत्त्व अनुच्छेद ३६८ अंतर्गत अधिकारांच्या माध्यमातून बदलता येणार नाही असा निकाल दिला आहे. भारताने संघराज्य पद्धतीचा अवलंब केला. राज्य आणि केंद्र यांचे अधिकार ठरवून दिले आहेत. घटनाकारांनी विधिमंडळाला पाच वर्षांचा कार्यकाळ दिलेला आहे. राज्य सरकारांचे अधिकार हे केंद्र सरकारइतकेच महत्त्वाचे आहेत. राज्य सरकारांना संविधानात दुय्यम स्थान नसून लोकांनी स्थानिक राज्य, प्रांतांच्या प्रश्नासाठी निवडून दिल्याने राज्य सरकारांचे स्थान आणि अधिकार हे समानतेच्या निकषात मोडतात. ह्यएक देश, एक निवडणूकह्व अस्तित्वात आल्यास राज्य सरकारांचा कार्यकाळ विसर्जित करून तो नव्या निवडणुकांनंतर उर्वरित काळापुरता मर्यादित ठेवणे संविधानाच्या मूळ तत्त्वातील बदल म्हणून न्यायालयीन निकालाच्या अधीन असेल. न्यायालयीन निकालावरच ह्यएक देश, एक निवडणूकह्व या संकल्पनेचे भवितव्य निश्चित होईल.

केंद्र सरकारचा 'एक देश, एक निवडणूक' या बाबतीतला अहवाल हा अनेक महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षित करणारा आणि अनावश्यक मुद्द्यांवर अधिक भर देणारा आहे, असे म्हणता येईल. समितीने विरोधातील अनेक मुद्दयांवर विश्लेषण आणि आक्षेप गृहीत धरल्याचे अहवालात दिसत असले तरी त्यावरील निष्कर्ष हे भविष्यातील परिणामांकडे न बघता इतिहासाकडे अंगुलीनिर्देश करणारे आहेत. अहवालात केंद्र आणि राज्यांच्या सांविधानिक अधिकारांचा उल्लेख आहे, त्याबाबत दुमत नाही. परंतु त्याबाबत जे सखोल विश्लेषण गरजेचे होते ते कुठेच आढळून येत नाही. एक देश एक निवडणुकीच्या शिफारशी भविष्यात अमलात आल्यास त्या राज्य सरकारांचे अधिकार, सातवी सूची, संघराज्य पद्धती, अनुच्छेद ३५६, परिशिष्ट दहा, समानता, मूलभूत अधिकारांवर प्रभावशाली ठरतील असे सध्याचे चित्र आहे. संविधानाच्या मूळ तत्त्वांच्या चौकटीबाहेर 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेचा अहवाल म्हणूनच सांविधानिक मर्यादांचे उल्लंघन करणारा ठरू शकतो.

# आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना मिळणार सुरक्षा कवच : सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

■ ठाणे : प्रतिनिधी,



ऑनर किलिंगच्या घटना थांबवून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे, ही सरकारची जबाबदारी आहे, तसे आदेश सरकारला द्यावेत, यासाठी शक्ती वाहिनीनामक संस्थेने सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आदेश पारित केले. ऑनर किलिंगच्या घटनांबाबत राज्य सरकार गंभीर झाले असून अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष कक्ष तयार करण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यातही कक्ष तयार झाला असून ऑनरकिलिंग रोखण्यासाठी तात्काळ कारवाई केली जाणार आहे. तसेच अशा जोडप्यांसाठी सुरक्षागृह तयार करण्यात येणार आहेत. संविधानात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार असताना आंतरधर्मीय किंवा आंतरजातीय विवाह करणा[illegible]या जोडप्यांसोबत ऑनरकिलिंग होणे, त्यात सरकार, प्रशासन कमी पडणे, याबाबत सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त करत देशातील प्रत्येक राज्यांना स्पेशल सेल स्थापन करण्याचे आदेश दिले. त्यासाठी नियोजन करण्यास बजावले आहे. त्या आदेशानुसार राज्य सरकारने याबाबतचे परिपत्रक काढले आहे. आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणा[illegible]या जोडप्यांना संरक्षण आणि सुरक्षित घर पुरवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी आणि पोलिस आयुक्तांच्या खांद्यावर सोपवली आहे. समितीमार्फत आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह करणा[illegible]या जोडप्यांना आवश्यकतेप्रमाणे सुरक्षागृहाची मदत पुरवण्याचे दक्षता घेणार आहे. ज्या ठिकाणी या जोडप्यांना पोलिस संरक्षण देता येईल, अशा ठिकाणी हे सुरक्षागृह असावे, अशी अट घातली आहे. या जोडप्यांना सुरुवातीला नाममात्र शुल्क आकारून एका महिन्यासाठी सुरक्षागृह उपलब्ध करून द्यायचे आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता जास्तीत जास्त एका वर्षापर्यंत सुरक्षागृह उपलब्ध करून द्यायचे आहे. याबाबतचे परिपत्रक महाराष्ट्र सरकारकडून काढण्यात आले आहे.

पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी या तिघांचा समावेश असलेला विशेष कक्ष सुरू करण्याला सुरुवात केली आहे. पोलिस आयुक्त/अधीक्षक या सेलचे अध्यक्ष असून जिल्हा समाजकल्याण अधिकारी सदस्य आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सदस्य सचिव असणार आहेत. या समस्येवर काम करण्यासाठी जिल्हाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी, संबंधित जिल्ह्यातील महापालिका आयुक्त, पोलिस अधीक्षक/ पोलिस आयुक्त, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी यांची समिती तयार केली आहे.

# नवीन इमारतींच्या बांधकामांना महापालिकेचे पाणी वापरता येणार नाही; ठाणे महापालिकेचे धोरण



■ ठाणे : प्रतिनिधी,

भविष्यात नवीन बांधकामांना परवानगी देताना भूजल किंवा महापालिकेचे पाणी वापरता येणार नसून, वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक करण्यात येणार असल्याची माहिती ठाणे महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे. इतर कामांसाठी वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी एसटीपी प्लांटवर टँकर फिलिंग पॉइंट तयार करण्याच्या सूचना अधिका[illegible]यांना देण्यात आल्या असल्याचे आयुक्तांनी सांगितले. पाणी वितरण व्यवस्थाही सुधारण्यासाठी प्रयन्त करण्यात येणार अशा प्रकारच्या धोरणांमुळे पाण्याची बचत होण्यास मदत होणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. ठाणे महापालिका क्षेत्रात आणि विशेष करून घोडबंदर पट्ट्यात भविष्यात पाण्याची गरज ही दुप्पट होणार आहे. ठाणे महापालिकेला हक्काचे धरण नसल्याने आजही महापालिकेला इतर स्त्रोतांवर अवलंबून राहावे लागते. ठाणे शहराला सध्या बृहन्मुंबई महापालिका, एमआयडीसी, स्टेम आणि ठाणे महापालिकेची स्वतःची योजना असा मिळून दररोज ५८२ एमएलडी पाणी उपलब्ध होते.


भविष्यातील पाण्याची गरज पाहता हे पाणी अतिशय अपुरे पडणार आहे. यातील दररोज ३२६ एमएलडी सांडपाण्यावर सेकंडरी ट्रीटमेंट करून हे पाणी खाडीत सोडले जाते. भविष्यातील पाण्याची गरज ओळखून नवनियुक्त आयुक्त सौरभ राव यांनी नवीन धोरण निश्चित केले असून, यापुढे इमारतीला परवानगी देताना भूजल किंवा ठाणे महापालिकेच्या पाण्याचा वापर न करता वापरलेल्या पाण्याचा वापर करणे बंधनकारक करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली आहे. ठाण्यातील काही भागात काही प्रमाणात पाणीटंचाई जाणवू लागली असली तरी किमान एक ते दीड महिना पाणी कपात होणार नसल्याचे आयुक्तांनी सांगितले. पाणी वितरण व्यवस्था सुधारण्याबरोबरच पाण्याची बचत आणि काटकसर यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. त्याचप्रमाणे दिव्याच्या पाणी प्रश्नासंदर्भात लवकरच उपाययोजना करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

# हत्या प्रकरणातील आरोपीला २९ वर्षांनी अटक

■ पालघर : प्रतिनिधी,

आगरवाडी रामबाग येथील एका कंपनीजवळ झालेल्या हत्या प्रकरणातील आरोपीला तब्बल २९ वर्षांनी पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. गुजरातमधील पारडी येथून या आरोपीला मंगळवारी (ता. २) अटक करण्यात आली. पुढील कारवाईसाठी त्याला सफाळे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. १९९५ मध्ये आगरवाडी रामबाग येथील एका कंपनीच्या पाठीमागे हरेश पटेल आणि मोहन दुबळी यांच्यात काही कारणावरून भांडण झाले होते. या भांडणात हरेश पटेल याने मोहन दुबळी यांची हत्या केली. पोलिसांनी हरेश पटेल याला अटक करून न्यायालयात हजर केले असता त्याला पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती; पण २६ एप्रिल १९९५ ला तो पोलिसांच्या तावडीतून पळून गेला. मूळचा आसाम येथील असलेल्या हरेशचा शोध पोलिसांनी तेथे जाऊन घेतला; पण त्याचा थांगपत्ता लागला नव्हता. आता तब्बल २९ वर्षांनी तो गुजरातमधील पारडी येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

# Monkeys call the shots in this Malad society



■ Mumbai

The summer heat is setting in, but the members of a high-rise society in Malad are forced to keep their windows shut at all times due to the fear of monkeys raiding their apartments. Society members have reported that monkeys are climbing from the scaffolding up to the 39th floor of the high-rise building and entering houses to eat food from the fridge and cause property damage.

The monkey nuisance has spread throughout the Sethia Imperial Avenue high-rise society located along the Western Express Highway in Malad East. Monkeys have been entering houses for the past two weeks. The society members say they have lodged complaints with the forest department, but were told no help could be provided. They were advised to stop feeding the primates and keep their windows shut.

A society member said, "Around 15 days ago, construction work began in our new society, and scaffolding was installed around the building. The monkeys started climbing the scaffolding and entering the apartments through windows. Since we do not have grills, the monkeys easily gain entry." Another resident said that the monkeys are especially active during the afternoon. "They open the fridge and gather food... open food containers and toss utensils around to find food. They also sit on sofas and quietly eat the food."

According to another resident, apartment windows would be kept open as the summer heat kicked in, but due to the monkey menace, they have to be shut constantly. "The lack of fresh air makes it suffocating," the resident said. A resident said, "We have reached out to the forest department and Dindoshi police station for assistance but have not received any help so far.

The forest department told us that they are unable to catch the monkeys, which they consider impossible. They advised us to not feed the monkeys in the hope that they would stop coming there and also suggested keeping the windows shut at all times. However, the monkeys manage to sneak in and ransack the apartment for food. Also, it is challenging to keep the windows shut at all times."

15 : No of days the monkeys have harassed residents

# Virat Kohli 'hurt' as RCB cut somber figure inside dressing room following crushing defeat; post-match speech not enough



■ Mumbai

Royal Challengers Bengaluru suffered their third loss of the season on Tuesday after another below-par performance this season. With the defeat against Lucknow Super Giants, their chance of getting to playoffs got hurt. They have won just one match out of four and looking at their performances things are not looking good for them at the moment.

The star-studded franchise has failed to put up a collective effort on the field as both batting and bowling have underperformed thus far this season. The over-reliance on Virat Kohli in the batting department has grown as the other big stars Faf du Plessis, Cameron Green and Glenn Maxwell have failed to find their mojo, while talented Rajat Patidar is also finding it tough with his underwhelming form in recent times.

After the LSG defeat, the players including Kohli looked dejected in the dressing room as the new head coach Andy Flower addressed them with a post-match speech.

"We have exciting opportunities just around the corner in a few days time. The opportunity that I see how can we respond. It was a tough day! Everyone in this room is hurting. But the opportunity that I see is, how can we respond?" Flower said on X.

Skipper Du Plessis thanked the fans for their massive support at home ground and will look to see them back when they return to Chinnaswamy for the next home leg.

"RCB fans thank you very much for your support. It's amazing to see the fans, disappointed with the last two performances. The team is hurting up there but we are very grateful for your support and we have to see you back when we get back to Bengaluru, Thank you so much, it means so much to us," Du Plessis said.

Meanwhile, Lucknow defeated Du Plessis and Co. by 28 runs in their IPL match on Tuesday. Opener Quinton de Kock hit 8 fours and 5 sixes in his entertaining 56-ball 81 before Nicholas Pooran smashed five sixes en route a 21-ball 40 not out to power LSG to 181 for five. In reply, RCB were all out for 153 in 19.4 overs.

# बदलापुरातील केमिकल कंपनीला भीषण आग

**जीवितहानी नाही, मात्र अग्निशमन दलाचा कर्मचारी किरकोळ जखमी**



■ **बदलापूर:** बदलापूर एमआयडीसीतील डी. के. फार्मा या केमिकल कंपनीला मंगळवारी भीषण आग लागली. या आगीत कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी आग विझवताना अग्निशमन दलाच्या एका कर्मचाऱ्याला किरकोळ दुखापत झाली आहे. अग्निशमन दलाने ही आग विझविली असली तरी आगीचे निश्चित कारण अद्याप समजू शकलेले नाही.

बदलापूरच्या एमआयडीसी परिसरात प्लॉट नंबर १५ येथील डी.के फार्मा या केमिकल कंपनीला मंगळवारी दुपारी १२ च्या सुमारास अचानक भीषण आग लागली, डी.के.फार्मा या कंपनीत वैज्ञानिक प्रयोगशाळेत वापरण्यात येणारे व औषधांसाठी वापरात वापरात येणाऱ्या केमिकलवर प्रक्रिया होत असते. दुपारी अचानक कंपनीच्या ८/३२ या प्लॉटच्या शेवटच्या टोकाला असलेल्या रिक्टर आणि प्रोसेसर या भागात ही आग लागली. यावेळी आगीचे स्वरुप पाहता अग्निशमन दलाच्या ३ गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. यावेळी अग्निशमन दलाचे अधिकारी भागवत सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण टीम ने पाऊण तासात या आगीवर नियंत्रण मिळवले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कंपनीतील आग प्रतिबंधक यंत्रणेचा वापर करण्यात आल्याने आग जास्त प्रमाणात वाढली नाही अशी माहिती सोनोने यांनी दिली. या कंपनीत एकूण १५० कर्मचारी असून, शिफ्ट नुसार ड्युटी असल्याने, घटना घडली तेव्हा कंपनीत साधारण १०० माणसे असल्याचा अंदाज कंपनी व्यवस्थापक अजित बेहरे यांनी दिली. या घटनेत कंपनीचे मोठे नुकसान झाले असून सुदैवानं कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी, कंपनीत असलेल्या आग प्रतिबंधक यंत्रणेने आग विझवताना अग्निशमन दलाच्या एका कर्मचाऱ्याला किरकोळ दुखापत झाली असून, केमिकल आणि आगीचे डोळ्यांना रिॲक्शन झाल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले. या आगीचे निश्चित कारण समजले नसून शॉर्ट सर्किटमुळे ही लागली असावा प्राथमिक अंदाज असल्याचे भागवत सोनोने यांनी सांगितले. यापूर्वी जानेवारी महिन्यातच पहाटेच्या सुमारास विके केमिकल कंपनीत झालेल्या स्फोटाने भीषण आग लागली होती.

# मुरबाड-कल्याण नगर महामार्गावर अपघात, एक ठार



■ **मुरबाड :** मुरबाड-कल्याण नगर राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका कायम असून खाटेघर-डेहोणोली गावाच्या हद्दीतील वळणावर एसटी महामंडळाची बस व कार यांच्यात समोरासमोर धडक होऊन कार मधील जयराम बाळु कवटे जागीच ठार झाले .

.जयराम कवटे हे कल्याण डोंबिवली महानगर पालिकेत शिपाई पदावर कार्यरत होते. तर त्यांचा मुलगा दीपक जयराम कवटे हा किरकोळ जखमी असून त्याला मुरबाड येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वाहन चालक न आल्याने मुलगा वडिलांना कामावर सोडण्यासाठी निघाला असता हा अपघात झाला. कल्याण नगर राष्ट्रीय महामार्गावर सतत अपघात होत असतात व अनेकांना कायमचे जायबंदी व्हावे लागते.तर कित्येकांना जीव गमवावा लागला आहे . हा रस्ता अरुंद व वेडीवाकडी वळणे असल्याने हे अपघात होत आहेत.

कल्याण- डोंबिवली महानगर पालिकेत शिपाई पदावर असलेले जयराम कवटे हे सोमवारी सकाळी कामतपाडा या आपल्या गावावरून कामावर जाण्यासाठी आपल्या कारने निघाले . त्यांची कार खाटेघर पर्यंत आली असता तेथील वळणावर समोरुन येणाऱ्या एसटी बसवर जाऊन धडकली. कारसह एसटीचे देखील मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. जयराम कवटे यांचा नेहमीचा चालक न आल्याने त्यांचा मुलगा दीपक हा आपल्या वडिलांना कामावर सोडण्यासाठी जात होता. मात्र वळणावर पुढे जाणाऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात समोरुन येणाऱ्या एसटी बसवर जाऊन त्यांची कार धडकली .या अपघाताची नोंद मुरबाड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.व पुढील तपास पोलीस करत आहेत.

## हळदीच्या वेळी सोन्याचे मंगळसूत्र लंपास

■ **भिवंडी :** नातेवाईकांकडे हळदी समारंभासाठी गेलेल्या महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने दुचाकीच्या डिकीतून चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी अज्ञात चोरट्याच्या विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावंदे गावातील लीना रुपेश भोईर ही महिला तिच्या गुंदवली येथील नातेवाईकांकडे ३१ मार्च रोजी रात्री हळदी समारंभाच्या कार्यक्रमासाठी गेल्या होत्या.दरम्यान त्यांनी ३ लाख ६० हजार रुपये किमतीचे १२ तोळे वजनाचे मंगळसूत्र आपल्या डियो दुचाकीच्या डिकीमध्ये ठेवले होते.त्यावेळी लीना यांनी मंगळसूत्र ठेवत असताना त्यावर पाळत ठेवून असणाऱ्या अज्ञात चोरट्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत रात्री हातचलाखीने दुचाकीच्या डिकीतून मंगळसूत्र लंपास केला आहे.तर ही बाब लक्षात येताच लिनाने नारपोली पोलीस ठाणे गाठून अज्ञाताच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे.पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

# सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यात बँकेतील आजी व माजी अधिकारी अटकेत

**आरोपींना बँक खाते उघडून देत असल्याचे उघड**

■ **नवी मुंबई :** उलवे येथील एका डॉक्टरची तब्बल ३३ लाख रुपयांच्या सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यात इंडसइंड बँकेच्या आजी व माजी अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार सायबर पोलिसांनी उल्हासनगर येथील इंडसइंड बँकेच्या आजी व माजी अधिकाऱ्यांना अटक केली आहे. हे दोघेही शेअर्स ट्रेडिंगच्या नावाने फसवणूक करणाऱ्या टोळीला बँकेत चालू खाते उघडून देत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सायबर पोलिसांनी आता या टोळीतील इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे.


शेअर ट्रेडिंग खरेदी-विक्रीच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्या टोळीने गत फेब्रुवारी महिन्यामध्ये उलवे परिसरात राहणाऱ्या एका डॉक्टरकडून तब्बल ३३ लाख रुपये उकळून त्यांची फसवणूक केली होती. याबाबत नवी मुंबईच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विजय आयरे व पोलीस नाईक रवीराज कांबळे यांनी सखोल तांत्रिक तपास सुरू केला. या तपासात इंड्सइंड बँकेतील माजी कर्मचारी प्रवीणकुमार रमेश मिश्रा (२६) याचा सहभाग असल्याचे तसेच तो सायबर फसवणुकीकरिता वापरणारे बँक खाते हाताळत असल्याचे आढळून आले. त्यामुळे सायबर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची अधिक चौकशी केली असता, उल्हासनगर नंबर-३ येथील इंडसइंड बँकेत कार्यरत असलेला त्याचा साथीदार अशोक श्यामलाल चौहान (२७) याच्यासोबत मिळून त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानुसार सायबर पोलिसांनी या दोघांना अटक करून त्यांच्याकडून ४ मोबाईल फोन, ८ सिमकार्ड, ७ डेबिट कार्ड, २ चेकबुक, ३ पासबुक, ६ रबरी स्टॅम्प असे साहित्य जप्त केले. उलवे येथील डॉक्टरच्या फसवणूक प्रकरणात फसवणुकीची रक्कम भरलेली सर्व बँक खाती गोठविण्याबाबत तत्काळ पत्रव्यवहार करण्यात आल्याने सदर बँक खात्यातील १५ लाख ३१ हजाराची रक्कम गोठविण्यात सायबर पोलिसांना यश आले आहे



आरोपी प्रवीणकुमार मिश्रा हा उल्हासनगर नंबर-३ येथील इंडसइंड बँकेत आरोपी अशोक चौहान याच्यासोबत नोकरीस होता. आरोपी प्रवीणकुमार हा चालू खाते उघडण्याकरिता अशोक चौहान याच्याकडे ग्राहक घेवून जात होता. त्यानंतर अशोक चौहान हा सदर ग्राहकांचे चालू खाते उघडून त्यांचे डेबिट कार्ड, एटीएम, चेक बुक व बँकेशी संलग्न मोबाईल क्रमांक व सिमकार्ड स्वतकडे ठेवून घेत होता. सदर चालू खाते कार्यान्वित झाल्यानंतर तो त्यांच्या पुढील साथीदारांना बँक खाते देवून सदर खात्याचा वापर सायबर फसवणुकीसाठी करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणातील सायबर टोळीचा महाराष्ट्र राज्यासह देशभरातील विविध राज्यातील ४ सायबर तक्रारीमध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच या आरोपीविरोधात दिल्ली सायबर पोलीस ठाण्यात ४२० नुसार गुन्हा दाखल आहे. या टोळीत सहभागी असलेल्या इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.
**-अजयकुमार लांडगे (सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा)**

# प्रेमसंबंधातून महिलेची हत्या करणाऱ्याला ६ महिन्यांनंतर अटक




■ **पनवेल :** पनवेलमधील भिंगारी गावातील निर्जनस्थळी ६ महिन्यांपूर्वी महिलेचा गळा दाबून खून करून पळून गेलेल्या अज्ञात आरोपीला मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा नवी मुंबई यांनी अटक केली आहे. पांडव गोरख जाधव ऊर्फ पांड्या (२१, रा. मालधक्का झोपडपट्टी पनवेल) असे या आरोपीचे नाव आहे.

भिंगारी गावच्या निर्जनस्थळी १० ऑक्टोबर २०२३ ला एका महिलेचा खून झाल्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने तांत्रिक तपास व बातमीदाराच्या आधारे तपास सुरू केला. मृत महिलेच्या संपर्कात असणाऱ्या व्यक्ती व परिसरात राहत असणाऱ्या व्यक्ती यांच्याकडील माहितीच्या आधारे व गुप्तबातमीदारांकडून मृत महिलेसोबत राहणाऱ्या अनोळखी इसमाची माहिती मिळाली. त्यानुसार यातील महिलेचा गळा दाबून परागंदा झालेल्या अनोळखी इसमानेच खून केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले. अनोळखी इसम हा २९ मार्च २०२४ रोजी ओरियन मॉल पनवेल येथे असल्याबाबतची माहिती पो. हवा. महेश पाटील यांना मिळाल्याने मध्यवर्ती कक्षाचे वपोनि सुनील शिंदे यांनी तत्काळ सपोनि अलका पाटील, स.फौ. मंगेश वाट, बोराडे यांचे पथक पाठवून पांडव गोरख जाधव ऊर्फ पांड्या याला शिताफीने ताब्यात घेऊन मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा बेलापूर, नवी मुंबई येथील कक्षात आणले. त्याच्याकडे सतत ७ ते ८ तास कौशल्यपूर्ण केलेल्या चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. गुन्हा केल्यानंतर आरोपीने स्वतःची ओळख लपवून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये व गुजरात राज्यातील सुरत येथे राहिल्याची कबुली दिली. आरोपीला पुढील तपासकामी पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. अटक आरोपी व मृत महिलेचे प्रेमसंबंध होते. घटनेच्या दिवशी आरोपी व मृत महिलेने मद्य प्राशन केले होते. यावेळी आपसात झालेल्या भांडणातून आरोपीने यातील महिलेचा गळा दाबून खून केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

## परीक्षेसाठी गेलेली मुलगी बेपत्ता

■ **ठाणे :** ठाण्याच्या चरई परिसरात ११ वीचा शेवटचा पेपर देण्यासाठी गेलेली अल्पवयीन मुलगी शनिवारपासून बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या वडिलांनी दाखल केली असून तिला फूस लावून पळवले गेले असल्याचा त्यांना संशय आहे.शनिवारी अकरावीचा शेवटचा पेपर होता. परिक्षेनंतर मुलीला घरी नेण्यासाठी ते शाळेच्या गेटबाहेर वाट पाहत बसले होते. मात्र पेपर सुटल्यानंतरही मुलगी बाहेर न आल्याने त्यांनी शाळेत विचारणा केली. तेव्हा ती थोड्या वेळापूर्वीच बाहेर पडल्याचे सांगण्यात आले. मुलीचा शाळेच्या आसपास शोध घेतल्यानंतर मित्र परिवाराकडेही शोध घेण्यात आला. मात्र ती न सापडल्याने नौपाडा पोलीस ठाण्यात त्यांनी अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याबाबत गुन्हा दाखल केला.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार



■ **नवी मुंबई :** २३ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे पीडित तरुणी गरोदर राहिल्यानंतर आरोपीने गोळ्या देऊन तिचा गर्भपात केला. त्यानंतर पीडित तरुणी अनुसूचित जातीची असल्याचे कारण पुढे करून तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. हर्षल महेश म्हात्रे (२७) असे या तरुणाचे नाव असून तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कारासह अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

या घटनेतील पीडित तरुणी सानापाडा भागात राहण्यास असून आरोपी हर्षल महेश म्हात्रे हा भिवंडी येथे राहतो. वर्षभरापूर्वी या दोघांची ओळख झाली होती. या ओळखीतून प्रेमसंबध निर्माण झाल्यानंतर आरोपी हर्षल म्हात्रेने पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत जवळीक वाढवली. त्यानंतर त्याने पीडित तरुणीला महापे एमआयडीसीतील लॉजिंग अॅण्ड बोर्डिंगमध्ये नेऊन तिच्यासोबत वारंवार शरीरसंबंध ठेवले. त्यामुळे पीडित तरुणी गरोदर राहिल्यानंतर आरोपी हर्षल म्हात्रने तिला गर्भपाताच्या गोळ्या देऊन तिला गर्भपात करण्यास भाग पाडले.

त्यानंतर पीडित तरुणीने लग्न करण्यासाठी तगादा लावल्यानंतर आरोपी हर्षल म्हात्रेने पीडित तरुणी अनुसूचित जातीची असल्यामुळे तिला जातीवरून शिवीगाळ केली तसेच तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिला. हर्षल म्हात्रेने अशा पद्धतीने फसवणूक केल्यानंतर पीडित तरुणीने तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणात अद्याप आरोपीला अटक करण्यात आली नसून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल गायकवाड यांनी दिली.

# खेळताना मुलीच्या हातात रॉड घुसला

■ **मीरा रोड :** काशिमीरा येथील पूजा अपार्टमेंट , काशीगाव येथे ९ वर्षाची मुलगी खेळत असताना ती झाडाचे पान घेण्यासाठी ग्रीलवर चढली. यावेळी त्या चिमुरडीचा पाय घसरून ती खाली पडली. सुरक्षा भिंतीला लावलेले ग्रील तिच्या हातात आरपार घुसले. त्यावेळी डॉक्टरांनी वेळीच घटनास्थळी पोहोचून लहान मुलीचा जीव वाचवला.

सोमवारी सायंकाळी पूजा अपार्टमेंट , काशीगाव येथे इमारतीच्या खाली लहान मुले खेळत होती. त्यामध्ये ९ वर्षाची लहान मुलगी झाडाचे पान घेण्यासाठी भिंतीच्या सुरक्षा जाळीवर चढली. त्यावेळी तिचा पाय घसरून लोखंडी रॉड हातामध्ये आरपार घुसला.त्यावेळी आरडाओरड एकूण आजूबाजूचे नागरिक पोहोचले. जवळच असलेल्या आशिष रुग्णालयाचे डॉक्टर राजेश पालांडे यांना बोलावले. डॉक्टरांनी तेथे वेळीच पोहोचून मोठ्या हिंमतीने धाडस दाखवून जागेवरच त्या छोट्या मुलीला भुलीचे इंजेक्शन देऊन रॉड काढला व अनर्थ टाळला.

कौशल्य व हुशारीने डॉ .राजेश पालांडे यांनी तिचा हात वाचवला. डॉक्टर वेळीच पोहोचले नसते तर तिच्या जीवाला देखील धोका निर्माण झाला असता असे डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर डॉक्टरांनी या मुलीला ताबडतोब रुग्णालयात आणले व शस्त्रक्रिया केली. मुलीची तब्येत चांगली असून तिच्या आई , वडील व नातेवाईकांनी डॉक्टरांचे आभार मानले.

# हत्याप्रकरणातील आरोपी पोलिसांच्या जाळ्यात



■ **नवी मुंबई :** तळोजा येथील बारा वर्षीय मूकबधिर मुलावर लैंगिक अत्याचार केल्यानंतर त्याचे हातपाय बांधून त्याचा मृतदेह तळ्यात टाकून देणारा नराधम आरोपी पोलिसांच्या हाती लागला आहे. रमजान मोहम्मद शेख (२१) असे या आरोपीचे नाव आहे. विशेष म्हणजे गुटखा खाऊन टाकून देण्यात आलेल्या पुडीवरून पोलिसांनी त्याचा यशस्वीपणे माग काढला.

गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाने ही कारवाई केल्यानंतर आरोपीला डायघर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या घटनेतील मृत १२ वर्षीय मूकबधिर मुलगा दहिसर भागातील रहिवासी असून आरोपी रमजान मोहम्मद शेख हादेखील त्याच भागात राहत होता. २५ मार्च रोजी तळोजा हद्दीतील तळ्यामध्ये हातपाय बांधलेल्या स्थितीत या मुलाचा मृतदेह आढळून आला होता. यानंतर गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे व मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांनी घटनास्थळी पथकासह भेट दिली. यावेळी पोलिसांना घटनास्थळापासून ५० मीटर अंतरावर मृत मुलाची पँट व त्याच्याजवळ गुटखा खाऊन टाकून देण्यात आलेली पुडी आढळली होती. गुन्हे शाखेने घटनास्थळावरील पुरावे ताब्यात घेऊन आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन पथके तयार केली.

त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपासावरून ८ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडे सखोल तपास केला असता त्यापैकी दहिसर येथील ठाकूरपाडा येथे राहणारा रमजान मोहम्मद शेख हा गुटखा खात असल्याचे तसेच घटनास्थळावर सापडलेली गुटख्याची पुडीही त्यानेच खाऊन टाकल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुन्हे शाखेने रमजान मोहम्मद शेख याला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी केली, तेव्हा त्याने शारीरिक सुखाकरिता या मुलाचे अपहरण करून त्याच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे सांगतानाच आपले बिंग फुटेल, या भीतीने त्याची हत्या करून त्याचा मृतदेह तळ्यात टाकल्याची कबुली दिली. त्यानंतर गुन्हे शाखेने आरोपी रमजान शेख याला पुढील कारवाईसाठी डायघर पोलिसांच्या स्वाधीन केले.

## १९३ कोटींची विक्रमी मालमत्ता करवसुली

■ **मीरारोड :** मीरा भाईंदर महापालिका मालमत्ता कर विभागामार्फत सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षात १९३ कोटीची विक्रमी करवसुली करण्यात आली आहे.मीरा भाईंदर महापालिका मालमत्ता कर विभागामार्फत ३१ मार्च २०२४ रोजी मध्यरात्रीपर्यंत १९३ कोटीची विक्रमी कर वसूली करण्यात आली आहे. मीरा भाईंदर महापालिका आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली सततच्या मालमत्ता कर विभाग आढावा बैठकीनुसार शहरातील मालमत्ता कराचा सतत पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

# सीएचे डेबिट-क्रेडिट कार्ड चोरून लाखोंची फसवणूक

■ **मुंबई :** क्रॉस मैदानात क्रिकेट सामना खेळण्यासाठी आलेल्या एका सनदी लेखापालाच्या (सीए) बॅगमधून डेबिट आणि क्रेडिट कार्डची चोरी करत लुटारुंनी रोख रक्कम लंपास करण्यासोबतच दागिने खरेदी करून त्यांची ६ लाख ७२ हजारांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून आझाद मैदान पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

बोरिवली पूर्वेकडील दौलत नगरमध्ये कुटुंबासोबत राहत असलेले २८ वर्षीय तक्रारदार हे व्यवसायाने सीए असून ते एका खासगी कंपनीत नोकरी करतात. कंपनीतील कर्मचाऱ्यांनी ३० मार्चला क्रॉस मैदानात क्रिकेट सामन्याचे आयोजन केले होते. दुपारच्या वेळी सामना सुरू होण्यापूर्वी तक्रारदार यांनी तंबूमध्ये कपडे बदली करून कपडे, खिशातील फोन आणि पाकीट बॅगमध्ये ठेवले. ही बॅग त्यांनी अन्य सहकाऱ्यांसोबत तंबूमध्ये ठेवली होती.लुटारूने त्यांच्या बॅगमधील डेबिट आणि क्रेडिट कार्ड चोरी केले. पुढे, कार्डचे पीन नंबर बदली करून रिगल सिनेमा येथील एटीएम सेंटरमधून ६० हजार रुपये आणि अन्य ठिकाणावरून ४० हजार रुपये रोख रक्कम काढली. तसेच सुंदरदास अॅण्ड सन्स ज्वेलर्स, सुराना गोल्ड, चेतना ज्वेलर्स आणि मनीष गोल्ड पॅलेस या ज्वेलर्स दुकानांतून सोन्याचे दागिने खरेदी केले.



तक्रारदार यांची अशी एकूण ६ लाख ७२ हजार १११ रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती. याबाबतचे संदेश मोबाईलवर बघितल्यावर त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. अखेर, तक्रारदार यांनी दोन्ही कार्ड बंद करून घेत ऑनलाइन तक्रार नोंदवली. त्यानंतर, त्यांनी आझाद मैदान पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.

# बस प्रवासात साडेचार लाखांचा ऐवज लंपास करणाऱ्या चोरट्याला बेड्या

■ **मुंबई :** कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट अशा प्रवासादरम्यान एका प्रवाशाच्या बॅगेतील हिरे आणि सोने असा साडेचार लाख रुपये किमतीचा ऐवज लंपास करणाऱ्या पोलीस अभिलेखवरील ४० वर्षीय आरोपीला आझाद मैदान पोलिसांनी बेड्या ठोकल्या. मोहम्मद शमीम यामीन कुरेशी असे आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळून चोरीचा सर्व ऐवज हस्तगत केला आहे.

कफ परेडमधील कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग परिसरात राहत असलेले ४७ वर्षीय तक्रारदार हे २७ मार्चच्या दुपारी तीनच्या सुमारास बसने कुलाबा बस डेपो ते क्रॉफर्ड मार्केट असा प्रवास करत होते. त्यांच्या बॅगमध्ये ३ लाख ८० हजार रुपये किमतीचे ४.५ कॅरेट वजनाचे हिरे, ४३ हजार रुपये किमतीचे १.२७ कॅरेट वजनाचे हिरे आणि २५ हजार रुपये किमतीची ५.९७ ग्रॅम वजनाची सोनसाखळी असा ऐवज होता.

प्रवासादरम्यान आरोपी कुरेशी याने बॅगेतील हा ऐवज लंपास करून पळ काढला. प्रवाशाने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून आझाद मैदान पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि. लीलाधर पाटील यांच्या पथकाने गुन्ह्यातील तांत्रिक पुराव्यांच्या मदतीने कुरेशीचा माग काढत त्याला पवईतील राहत्या परिसरातून बेड्या ठोकल्या. फळे विक्रेता असलेला कुरेशी हा पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरोधात लोकमान्य टिळक मार्ग, भायखळा, कुलाबा, ताडदेव, भोईवाडा आणि पायधुनी पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत.

# वणव्यात कातकऱ्यांची घरे जळून खाक



■ **वाडा :** वाडा तालुक्यातील मौजे गारगांव येथील एका खाजगी मालकीच्या माळरानातील गवताला लागलेला वनवा थेट कातकरी वस्ती पर्यंत येऊन या वस्तीतील ९ घरे जळून खाक झाली आहेत. गावकऱ्यांच्या अथक प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आणल्याने या वस्तीतील काही घरे आगीपासून वाचवता आली. सोमवारी ही घटना घडली.

गारगांव या दिड हजारांहून अधिक लोकवस्ती असलेल्या गावाच्या पश्चिमेला कातकरी वस्ती आहे. या वस्तीलगत वसई येथील एका रहिवाशांनी मोठया प्रमाणात वरकस (माळरान) जमीन खरेदी केलेली आहे. या वरकस जमीनीत मोठ्या प्रमाणावर सुकलेले गवत आहे. या गवताला अज्ञात कारणाने आग लागली. कडक उन्हामुळे व संपूर्ण गवत सुकलेले असल्याने काही मिनिटातच ही आग या माळराना लगत असलेल्या कातकरी वस्ती पर्यंत पोहोचली. व अवघ्या अर्ध्या ते पाऊण तासात या वस्तीतील ९ घरे जळून खाक झाली. दोनशेहून अधिक येथील ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नाने ही आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला.या आगीत राजेंद्र भोये, मारवत हेलीम, मंगळ मुकणे, नितीन मुकणे, लक्ष्मण दिवा, संदिप भोये, नारायण भोये या सात कुटुंबियांची संपूर्ण घरे, घरातील संसार उपयोगी वस्तू, धान्य, कपडे जळून खाक झाले आहे. तर अन्य दोन घरांचे अंशताः नुकसान झाले आहे. दरम्यान या आगीच्या नुकसानी बाबत महसूल कर्मचाऱ्यांकडून पंचनामा करण्यात आला.